

लाल बागेतील मेंढा

लेखक: डेव्हीड मार्क

चित्रे: लायोनेल कलिश







लाल बागेतील मेंढा




मराठी अनुवादः
सुशील मेन्सन

भारताच्या दक्षिणेला एक छोटंसं शहर होतं. त्यात लाल बाग नावाचं एक मोठं उद्यान होतं.






कित्येक मैल दूरवरून लोक तिथे श्रमपरिहारासाठी येत असत. सुट्टीच्या दिवशी लोक सहल काढून तिथे मौजमजा करत असत. भारतात लोक खूप मेहनत करतात, पण त्यांना सुट्ट्यादेखील भरपूर असतात.



लोक तिथे तळ्यातील कमळाच्या पांढऱ्या शुभ्र पाकळ्यांची उघडझाप बघत, रबरासारखी लवचिक रोपटी, चिकट रोपटी आणि काचघरातील नागमोड्या वेली बघत, पळसाची लाल शुष्क फुलं न्याहाळत, बागेत कारंजाच्या उडणाऱ्या पाण्यामध्ये बनणारे इंद्रधनुष्य बघत.



पण बहुतांशी लोक कुरणातील गवत कापणाऱ्याला पाहायला येत.

ते काही गवत कापणारं नवीन, आधुनिक यंत्र नव्हतं. ते वेगाने गवत कापत नसे. खरंतर, ते यंत्र नव्हतंच. तो एक मेंढा होता. त्याचं नाव होतं रमेश.



दररोज सकाळी, सूर्योदय झाल्यावर, रमेश कुरणाच्या एका कोपऱ्यापासून सुरुवात करत असे. तो आपलं डोकं झुकवून जमिनीवर पसरलेलं गवत खात असे, कापत असे.





सुट्ट्यांच्या दिवशी, तो खास पद्धतीने गवत खात असे. तो बाहेरच्या मोठ्या वर्तुळापासून गवत खायला सुरुवात करून आतमधील लहान होत जाणाऱ्या वर्तुळांकडे जात असे. शेवटी तो वर्तुळांच्या केंद्रभागी पोहोचत असे.

काही वेळा, रमेश केंद्रभागापासून बाहेर कोपऱ्यांकडे आणि बाजुंकडे गवत खात जात असे. शेवटी कुरणावर एक ताऱ्याचा आकार बनलेला दिसत असे. रमेशला आपल्या कामाचा खूप अभिमान वाटत असे.

सुट्ट्यांच्या दिवशी लोकांनी व्यत्यय आणल्यामुळे रमेशला गवत खायला फार वेळ लागत असे. लोक त्याच्याजवळ येऊन त्याच्या पाठीवर हात थोपटत, दात काढून हसून म्हणत, “रमेश!” बायका जवळ येऊन त्याचं डोकं कुरवाळत आणि हसून म्हणत, “रमेश!” मग काही मुलं येत आणि त्याच्या पाठीवर चढून सावकाशपणे त्याला चालवत. ते हसत-खिदळत ओरडत, “रमेश!”








या लोकांपैकी एकाचं नाव होतं, राजेंद्र. त्याच्या बायकोचं नाव होतं, कमला. त्यांच्या मुलाचं नाव होतं कृष्णा. त्यांचं एक शेत होतं गावात. पण आता ते आपली सारी जमीन गमावून बसले होते आणि शहरात नोकरी करायला आले होते. लाल बाग त्यांना आपल्या देशाची तर रमेश त्यांना आपल्या शेताची आठवण करून देत असे. “रमेश!” अशी हाक मारल्यावर त्यांना बरं वाटत असे.


पण भारतातील त्या छोट्याशा शहराचा महापौर गवत कापणाऱ्या त्या मेंढ्याने समाधानी नव्हता. त्याने बागेच्या अधिकाऱ्याला बोलावलं.


“आपल्याकडे गवत कापायला एक यंत्र असायला हवं,” महापौर म्हणाले.

“पण त्याची किंमत परवडणार नाही आपल्याला,” अधिकारी म्हणाला.

“लोकांना आपल्या शहराचा अभिमान वाटला पाहिजे,” महापौर खेकसले. “लोक देणग्या देतील यंत्रासाठी.”








यंत्रासाठी लोकांनी देणग्या दिल्या. राजेंद्र, कमला आणि कृष्णा यांनीही थोडे पैसे दान दिले.

लोकांना आपल्या शहराचा अभिमान बाळगायचा होता. पण त्यांना हे माहीत नव्हतं की आपण दिलेल्या देणग्यांमधून जे यंत्र आणणार आहेत, ते रमेशची जागा घेणार आहे.

रमेशने पहिल्यांदा जेव्हा यंत्राला गवत कापताना पाहिलं तेव्हा तो खूप उदास झाला. मान खाली घालून तो बागेतून बाहेर पडला आणि दूर एका टेकडीवर निघून गेला.






तिथे तो गवत चरणाऱ्या एका मेंढ्यांच्या कळपात सामील झाला
रमेश वर्तुळ वा ताऱ्याच्या आकारात गवत का खातो, हे त्या
मेंढ्यांना उमगलं नाही. त्यांना असंही दिसलं की रमेश
अध्येमध्ये आपली मान उंचावून उदास नजरेने टेकडीच्या
पायथ्याशी पाहात राहातो. मग ते रमेशला एकटं सोडून रवंथ
करत बसू लागले.




पुढल्या सुट्टीच्या दिवशी राजेंद्र, कमला आणि कृष्णा आणि आणखी बरेच लोक नेहमीसारखं फिरायला लाल बागेत गेले. त्यांनी तळ्यातील कमळं, काचेच्या घरातील रोपटी, कारंज्याचं पाणी, पळसाचा लालभडक फुलोरा या साऱ्याचा आनंद घेतला. पण जेव्हा ते कुरणात आले तेव्हा तिथे रमेश नव्हता. फक्त एक यंत्र होतं.



ते यंत्राची पाठ थोपटू शकत नव्हते, त्याचं डोकं कुरवाळू शकत नव्हते की त्याच्या पाठीवर चढून फिरू शकत नव्हते. परिणामी, हळूहळू लोकांनी बागेत येणं बंद केलं. कामाचे दिवस असोत वा सुट्टीचे, आता कुणीही बागेत येत नव्हतं.





महापौरांनी बागेच्या अधिकाऱ्याला बोलावलं. “लोक कुठायत?” महापौर खेकसले.


“रमेश गेल्यापासून लोक येत नाहीत बागेत,” अधिकारी उत्तरला.

“आपण त्या मेंढ्याला शोधून काढलं पाहिजे!” महापौर गरजले.

रमेशला हुडकून काढण्यासाठी एक समिती बनवण्यात आली. पण ही समिती मेंढ्यांच्या कळपातून रमेशला ओळखू शकली नाही.




मग राजेंद्र, कमला आणि कृष्णा रमेशला शोधायला टेकडीवर गेले. राजेंद्रला वाटलं की रमेशच्या अंगावरच्या लोकरीला स्पर्श करून तो त्याला ओळखू शकतो. कमलाला वाटलं की ती रमेशची नजर पाहून त्याला ओळखू शकते. म्हणून राजेंद्र कळपाच्या एका टोकाकडून मेंढ्यांना थोपटू लागला. कमला दुसऱ्या टोकाकडून मेंढ्यांचे डोळे निरखू लागली. पण त्यांना काही रमेश सापडला नाही. अचानक, कृष्णाची नजर एका मेंढ्यावर गेली. तो मेंढा एका वडाच्या झाडाभोवतीचं गवत वर्तुळाकार आकारात खात होता.





“रमेश!” कृष्णा ओरडला आणि उडी मारून मेंढ्याच्या पाठीवर बसला. “एक फेरी मारून आण!” आणि अशा तऱ्हेने रमेश पुन्हा लाल बागेत आला.



आता गवत कापणारं यंत्र कुरणातील गवत सरळ रेषेत, जलदरित्या कापतं, पण आठवड्यातील फक्त पाच दिवस! राजेंद्र, कमला आणि कृष्णा आणि इतर लोक खुश आहेत कारण त्यांचं शहर तंत्रज्ञानात अग्रेसर आहे. पण लोक आपापल्या कामात मग्न असल्यामुळे त्यांना यंत्र पाहाण्याची संधी मिळत नाही.

यंत्र काम करत असतं तेव्हा फक्त रमेशच त्याला बघू शकतो. पण आता रमेशला उदास वाटत नाही. तो त्याची मान खाली घालत नाही. कारण सुट्टीच्या दिवशी तो स्वतःच गवत कापणारं यंत्र असतो.

जेव्हा राजेंद्रसारखा माणूस त्याची पाठ थोपटत नसतो वा कमलासारखी बाई त्याचं डोकं कुरवाळत नसते, तेव्हा रमेश काचघराभोवताली असलेलं गवत वर्तुळाकार आकारात खात असतो, कापत असतो. जेव्हा कृष्णासारख्या मुलांना तो पाठीवर बसवून फिरवत नसतो, तेव्हा तो कारंजं आणि लाल फुलांच्या दरम्यान असलेलं गवत खाऊन ताऱ्याचा आकार बनवतो.

